**रविंद्र दामोदर पाबरेकर**
प्लॉट नं. ५७७, अमृत स्मृती,
फ्लॅट नं. ५०२, जामे जमशेद रोड,
माटुंगा (पू), मुंबई -४०००१९
दिनांक : ०९ जून २०२३
मो.नं. ९८२०५५३८८६

प्रति,
**मा.मुंबई पोलीस आयुक्त,**
**बृहन्मुंबई , लोकमान्य टिळक रोड,**
**मुंबई - ४००००१**

**विषय : मी केलेला लेखी तक्रार अर्ज या प्रकरणात मुख्य सहभाग असलेला चित्रकार अहमद मिकदाद याची चौकशी व जबाब न घेता माझा तक्रार अर्ज दिवाणी स्वरूपाचे आहे असे ठरवून तक्रार अर्ज दप्तरी दाखल करण्यात आलेला तक्रार अर्ज पुनश्च उघडण्याबाबत.**

**संदर्भ : कार्यवाहीस्तव सादर केलेला तक्रार अर्ज ऑफिस क्र. उप मुख्यमंत्री अन्वये गृहविभागास पाठविण्यात आलेले पत्र.**

सन्माननीय महोदय,

मी दिनांक ११ ऑगसट २०२२ रोजी “World Art Hub” या संकेस्थळावर माझ्या नावाचा गैरवापर करून दुसऱ्याच चित्रकाराची चित्रे विकण्यास ठेवून फसवणुक करणेबाबत माटुंगा पोलीस ठाणे येथे लेखी तक्रार अर्ज दाखल केला होता. (त्याची छायांकित प्रत जोडली आहे.) या प्रकरणातील मुख्य सहभाग असलेला चित्रकार अहमद मिकदाद यास चौकशीसाठी बोलावून त्याचा जबाब घेतला नाही. तसेच रवींद्र मारडीया यांच्याकडुन खालील बाबींचा खुलासा करून न घेता माझा तक्रार अर्ज प्रथम दर्शनी दिवाणी

स्वरूपाचा असल्याचा ठरवून आपण दिवाणी न्यायालयात दाद मागावी, अशा आशयाचे पत्र दि. ०३.०३.२०२३ रोजीच्या माहितीच्या अधिकारान्वये मिळाले आहे. (सोबत त्या पत्राची छायांकित प्रत जोडली आहे).

AHMAD MIQDAD याने त्याचे पेंटिंग माझ्या नावावर "World Art Hub" या वेबसाईटवर विक्रीसाठी ठेवले असताना त्यावर त्यांनी आक्षेप का घेतला नाही ? व ती बाब त्यांच्या निदर्शनास आली नाही का ? या बाबत त्यांना चौकशीस बोलावून त्यांचा जबाब घेणे या प्रकरणात महत्वाचे आहे.

तसेच  याबाबत श्री.रविंद्र मारडीया यांच्याकडून खालील खुलासा करणे आवश्यक असून त्यांचा फेर जबाब घेण्यात यावा. या संबंधित मुद्दे खालील प्रमाणे.

- "World Art Hub"हया संकेत स्थळावर माझ्या नावाने AHAMAD MIQDAD हया चित्रकाराचे पेंटींग विक्रीस ठेवले होते हे निदर्शनास आल्यावर ते तीन पेंटींग संबधित चित्रकाराच्या नावाने ऑनलाईन विक्रीकरीता का नाही ठेवल्या ?
- गुगल सर्च मध्ये वरील चित्रकाराचे नाव अस्तित्वात नाही.
- पेंटींगच्या मागे असलेले दोन मोबाईल नंबर नेहमी बंद असतात तसेच त्यावरील Email - artmikka@gmail.com हा कोणाच्या नावे नोंद आहे. याचा तक्रार अर्ज करून DCP मार्फत पाठपुरावा करूनही माळी साहेब देण्याचे टाळत आहे. (IW – 2361 to Matunga Police Stn. Date 19.05.2023)
- रविंद्र मारडीया यांना चौकशीसाठी बोलावल्यानंतर दुसऱ्याच दिवशी तीन्ही माझ्या नावाचा गैरवापर करून विक्रीस ठेवलेल्या पेंटींग वेबसाईट वरून हटवल्या गेल्या व एक दोन महिन्यात ही वेबसाईट बंद करण्यात आली.

- हे मला पडलेले मुलभूत प्रश्न संबंधित तपास अधिकाऱ्यांच्या निदर्शनास कशा नाही आल्या ? कि त्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष केले गेले ? ही महत्वाची बाब आहे.
- तसेच अहमद मिकदाद याचा जबाब घेऊन त्याचा रवींद्र मारडीया यांच्याशी संबंध काय याची चौकशी करण्यात यावी.

त्या दरम्यान वरील संकेतस्थळाचे फाऊंडर श्री. मारडीया याच्या विरूध्द गुन्हा नोंद करण्यासाठी मी तपास अधिकारी श्री. संतोष माळी यांच्या बरोबर पाठपुराव करीत होतो. डिसेंबर २२ च्या अखेरीस माळी साहेबांनी वरीष्ठ पोलीस निरिक्षक श्री. दिपक चव्हाण यांची भेट करून दिली. (त्याची नोंद व. पो.नि. कार्यालयात आहे तसेच छायाचित्रण ही काढले होते.) त्या भेटी दरम्यान माळी साहेबांनी रविंद्र मारडीया हे CR पाठवूनही हजर होत नाही असे चव्हाण साहेबांना सांगितले. त्यानंतर चव्हाण साहेबांनी माळी यांना तोंडी आदेश दिला की, एक दोन दिवस वाट बघा नाहीतर गुन्हा नोंद करा. (सोबत CR ची छायांकित प्रत जोडली आहे.) त्यानुसार माळी यांनी माझ्या ११ ऑगस्टच्या तक्रार अर्जाची तारीख २२ डिसेंबर २०२२ रोजी बदलण्यास सांगून पुन्हा तक्रार अर्ज दाखल करण्यात आला. (त्याची छायांकित प्रत जोडली आहे.) तरीही गुन्हा नोंद करण्यात जाणुनबुजुन टाळटाळ होत आहे. असे माझ्या निदर्शनास येत होते. एकदा तक्रार अर्ज केल्यानंतर पुन्हा दुसऱ्या तारखेला अर्ज सादर करण्यास सांगण्याबाबतचा संबंधित अधिकाऱ्यांचा हेतू काय ?

तसेच २२ डिसेंबर २२ तक्रार अर्ज अन्वये रविंद्र मारडीया यांनी ३ फेब्रुवारी २०२३ रोजी दिलेल्या थातुरमातूर जवाब (त्याची छायांकित प्रत जोडली आहे) याची संबंधित अधिकाऱ्यांनी घेतलेली दखल आणि समर्थन तसेच ११ ऑगस्ट २२ रोजीच्या तक्रारी अन्वये घेतलेल्या जवाबाची माहितीच्या अधिकारात केलेली टाळाटाळ ही गंभीर बाब आहे.

त्यासाठी अपिल केला आहे व त्याची सुनावणी दि. १२ जून २०२३ रोजी आहे. (सोबत त्यांच्या छायांकित प्रती जोडल्या आहेत.) माहितीच्या अधिकारा अन्वये मिळालेल्या दि. ०३.०३.२३ रोजीच्या पत्रानुसार माझ्या तक्रार अर्जाची बाब प्रथमदर्शनी दिवाणी स्वरूपाची असल्याची ठरवून आपण दिवाणी न्यायालयात दाद मागावी व माझा अर्ज दप्तरी दाखल केला. (सोबत पत्राची छायांकित प्रत जोडली आहे.)

गेली ८/९ महिने माटुंगा पोलीस स्टेशनचे संबंधित अधिकारी रवींद्र मारडीया यांना वाचविण्याचा प्रयत्न करीत आहेत असे मला ठामपणे वाटते. त्यात त्यांचा उद्देश काय ?

तरी या AHAMAD MIQDAD प्रकरणी चौकशीस बोलावून त्याचा जबाब घेण्यात यावा तसेच रवींद्र मारडीया यांची वर नमूद केल्याप्रमाणे फेरचौकशी करण्यात यावी.त्यामुळे या प्रकरणात माझ्या तक्रार अर्जात पारदर्शकता येऊन माझ्या तक्रार अर्जावर योग्य निर्णय घेणे शक्य होईल ही विनंती.

आपला विश्वासू,

**(रविंद्र दामोदर पाबरेकर)**